**पुणे महानगरपालिका**

**महिला व बाल कल्याण समिती**

**कार्यपत्रिका क्र.१३**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा गुरुवार,दिनांक १३/१०/२०१६ रोजी दुपारी १२=०० ( बारा ) वा. म.ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्र. ७०**

**मा. मिलींद काची यांचे दि. २८.९.२०१६ चे पत्र.**

बुधवार पेठ सिटी पोष्ट ऑफिस लगत असलेल्या स्वच्छतागृहामध्ये महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था नाही. तसेच त्याठिक़ाणी स्नानगृहांची संख्या जास्त आहे. सबब सदरच्या स्वच्छतागृहामध्ये महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करणे व स्नानगृहांच्या जागी मुतारीची व्यवस्था करण्यात यावी . तसेच त्याठिक़ाणच्या व्यवस्थापकां विषयी नागरिकांच्या व प्रशासनाच्या तक्रारी आहेत.

तरी त्याठिकाणी नवीन व्यवस्थापकांची नेमणूक व्हावी .

**विषय क्र. ७१**

**मा. सौ.कविता वैरागे यांचे दि.३.१०.२०१६ चे पत्र.**

प्रभाग क्र.६४ मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर दवाखान्याच्या बाजुला सुलभ शौचालयाच्या वरच्या मजल्यावरील विनावापर सिट वर्षानुवर्षे तसेच पडून असून त्याची सद्य:स्थितीमध्ये आवश्यकता नाही .त्याचा कोणत्याही प्रकारचा उपयोग नागरिकांना करता येत नाही.

तरी ते पाडून समाज उपयोगी कार्यक्रम करण्यासाठी तेथे हॉल बांधण्यात यावा.

**विषय क्र. ७२**

**मा. सौ. अस्मिता शिंदे व मा.सौ.संगिता तिकोणे यांचे दि.३.१०.२०१६ चे पत्र.**

पुणे महानगरपालिकेच्या करारानुसार शहरातील अनेक मोठ्या रुग्णालयांनी सवलीतीच्या दरात अथवा मोफत नागरिकांवर उपचार करणे क्रमप्राप्त आहे. मात्र बहुतांशी रुग्णालय याबाबत टाळाटाळ करीत असल्याचे चित्र गेली अनेक वर्ष निदर्शनास येत आहे.

तरी याबाबत पुणे म.न.पा.ने विशेष कक्ष व विशेष कार्याधिकारी यांची नेमणूक करावी व शहरातील रुग्णालय प्रत्येक महिन्यात किती नागरिकांना मनपा करारान्वये सवलतीत उपचार करतात याचा मासिक अहवाल नागरिकांना व सभासदांना उपलब्ध करुन देण्यात यावा.

**विषय क्र. ७३**

**मा. सौ.निता मंजाळकर यांचे दि.३.१०.२०१६ चे पत्र.**

प्रभाग क्र.२५ मध्ये जय बजरंग मित्र मंडळ शेजारील जुने सुलभ शौचालय पाडून नविन बांधण्यात यावे .

**विषय क्र. ७४**

डॉ.श्रीमती राजश्री राजा,आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी,नाशिक महानगरपालिका यांची पुणे महानगरपालिकेत एकतर्फी बदली करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र.मआ/(साप्र)/ आस्था/ १३, दि.३०.५.२०१६ चे पत्र .

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८.९.२०१६ रोजीच्या सभेत ठरले होते. )**

नगरसचिव

पुणे महानगरपालिका.